दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १२१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • रविवार दि.२५ जुलै २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## दरडग्रस्त तळीये गावाचे म्हाडा करणार पुनर्वसन : ना.जितेंद्र आव्हाड

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दरड पडून उद्ध्वस्त झालेल्या महाड तालुक्यातील तळीये गावाची जबाबदारी म्हाडाने घेतली असून, हे पूर्ण गाव नव्याने वसविणार असल्याची माहिती गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी दिली आहे.

तळीये गावावर गुरुवारी रात्री दरड कोसळली आणि होत्याचे नव्हते झाले. घरंच्या घरं दरडीखाली दबली जाऊन निष्पांपाचे जीव गेले.

निसर्गाच्या कुशीत वसलेल्या तळीयेमध्ये आता फक्त उद्ध्वस्त झालेले संसार, चिखल, मृत्यूचा तांडव, आक्रोश सुरु आहे.

दरडीमध्ये उद्ध्वस्त झालेले तळीये हे पूर्ण गाव वसविण्याची जबाबदारी म्हाडाने स्वीकारली आहे. मुख्यमंत्र्यांनी कोणालाही अडचण भासू देणार नाही, असा शब्द दिला आहे. तो पूर्ण करायला सुरुवात केली असल्याचे ना.जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.

# सर्वांचंच पुनर्वसन करु ; मुख्यमंत्र्यांचा तळीये दुर्घटनाग्रस्तांना आधार

## तळीये गावाची मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंकडून पाहणी



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तुमच्यावर कोसळलेला प्रसंग मोठा आहे. त्यामुळे तुम्ही स्वत:ला सावरा. बाकीच्या गोष्टी सरकारवर सोडा. आम्ही तुमचं पुनर्वसन करू. सर्वांना मदत दिली जाईल, अशा शब्दांत आधार देत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तळीये गावातील मृतांच्या नातेवाईकांचे अश्रू पुसले.


मुख्यमंत्री आज दुपारी सव्वा दोनच्या सुमारास तळिये गावात पोहोचले. यावेळी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री कु.आदिती तटकरे, मदत आणि पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार, परिवहन मंत्री अनिल परब, खासदार सुनील तटकरे, मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी मिलिंद नार्वेकर, आमदार भरत गोगावले, मुख्य सचिव सीताराम कुंटे, जिल्हाधिकारी निधी चौधरी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अपर पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ, महाडच्या प्रांत प्रतिमा पुदलवाड, पेण प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, पनवेल प्रांताधिकारी दत्तात्रय नवले, सुधागड तहसिलदार दिलीप रायण्णावर, उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर, पंकज गीरी, सुरज खाडे, युवराज खाडे, तळिये गावाचे सरपंच, ग्रामस्थांचे नातेवाईक आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री भर पावसात चिखलातून वाट काढत घटनास्थळी पोहोचले.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे घटनास्थळी येताच स्थानिक नागरिकांनी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी त्यांना घटनेची माहिती दिली. मुख्यमंत्र्यांनी स्थानिकांचं म्हणणं ऐकून घेतलं. त्यांचं सांत्वन करीत त्यांना धीर दिला. सध्याची नैसर्गिक परिस्थिती पहाता जलव्यवस्थापन हा विषय समजून घेऊन त्याचे योग्य प्रकारे नियोजन करणे आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी हानी कमी होईल. राज्यात आलेल्या नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीमध्ये केंद्रीय यंत्रणा राज्याला उत्तम सहकार्य करीत आहे. त्यामुळे आपत्तीग्रस्त नागरिकांच्या बचावकार्यास वेग आला आहे.



## संक्षिप्त...

### वरळीमध्ये इमारतीची लिफ्ट कोसळली; ४ जणांचा मृत्यू



**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईतील वरळीमध्ये निर्माणाधीन इमारतीमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. इमारतीची लिफ्ट कोसळून ४ जणांचा मृत्यू झाला आहे. घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान दाखल झाले असून त्यांच्याकडून मदतकार्य सुरू आहे. पार्किंगचं बांधकाम सुरू असताना लिफ्ट कोसळल्याची घटना घडली.

वरळी भागात एका निर्माणाधीन इमारतीची लिफ्ट संध्याकाळच्या सुमारास कोसळली.अंबिका बिल्डर्स शंकरराव पदपथ मार्ग, बीडीडी चाळ, हनुमान गल्लीत ही घटना घडली आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. तर अजूनही ६ जण आतमध्ये अडकल्याची माहिती समोर आली आहे. जखमींना तातडीने केईएम हॉस्पिटल आणि नायर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं आहे. घटनास्थळी अग्नीशमन दलाचे जवान बचावकार्य करत आहेत. अग्निशमन दलाच्या जवानांनी दिलेल्या माहितीनुसार, या इमारतीत पार्किंगचे बांधकाम सुरू होतं. त्याच दरम्यान लिफ्ट कोसळली. दुर्घटनेत ४ जणांचा मृत्यू झाला असून आत अडकलेल्या ६ जणांची सुटका करण्याचं काम सुरू आहे.

## पूरात वाहून गेलेल्या सहा वर्षीय ‘झोया’चा मृतदेह सापडला ; अन्य दोघांचा शोध सुरुच

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील तिघेजण महापूराच्या पाण्यात वाहून गेले होते. त्यातील २२ जुलै रोजी दामत येथून वाहून गेलेल्या झोया इब्राहिम मणियार या सहा वर्षीय मुलीचा मृतदेह सापडला आहे. तर इतर दोघांचा शोध पोलिसांकडून उल्हास नदीमध्ये सुरु आहे.

कर्जत तालुक्यातील देवपाडा आणि दामत येथील दोन असे तिघेजण वाहून गेले होते. १८ जुलै रोजी देवपाडा येथील २६ वर्षीय तरुण प्रमोद जगन जोशी हा कळंब येथे पोश्री नदीच्या पाण्यात मित्राबरोबर काठोकाठ भरलेली नदी पार करण्याची पैज पूर्ण करीत असताना वाहून गेला होता. तेव्हा-पासून त्याचा शोध सुरु आहे.

त्यानंतर २२ जुलै रोजी रात्री झोपेत असताना दामत येथील इब्राहिम मणियार (वय ४०) आणि त्यांची मुलगी झोया (वय ६) हे दोघे तेथील ओढ्याला आलेल्या पुराच्या पाण्यात वाहून गेले होते. त्या दोघांचा शोध नेरळ पोलिसांनी उल्हास



नदीच्या तीरावर स्थानिकांच्या मदतीने घेण्याचा प्रयत्न केला. परंतु २२ आणि २३ जुलै रोजी पूर्ण दिवस त्या दोघांचे मृतदेह सापडले नव्हते.

२४ जुलै रोजी सकाळी उल्हास नदीच्या तीरावर वसलेल्या भुईसावरे येथे नदीच्या कडेला गवतात मृतदेह आढळून आला होता. तेथील पो-लीस पाटील यांच्याकडून वांगणी पोलीस ठाण्यात माहिती देण्यात आली. नंतर नेरळ पोलीस तेथे पोहचले आणि त्यांनी तो मृतदेह २२ जुलै रोजी वाहून गेलेल्या झोया इब्राहिम मणियार हिचा असल्याचे नेरळ पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक संजय बांगर यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, देवपाडा येथील प्रमोद जोशी आणि दामत येथील इब्राहिम मणियार या दोघांचा शोध सुरुच आहे.

## तब्बल ८ तास हाल, खोळंबा, कोंडी आणि संताप; जनतेला नवीन पुलाची प्रतीक्षा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**


सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. येथील वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्गावर पाली व जांभुळपाडा अंबा नदी पुलावरुन बुधवारी (दि.२१) पाणी गेले. त्यामुळे प्रवासी, चाकरमानी व वाहने पुलाच्या दोन्ही बाजुस अडकून पडले होते. तब्बल ८ तासांनंतर रात्री ११ नंतर पाणी ओसरल्यावर वाहतूक सुरू झाली. परिणामी तब्बल ८ तासांहून अधिक काळ प्रवासी, वाहन चालक व चाकरमानी यांचे पुरते हाल झाले. गुरुवारी (ता.२२) देखील पुलावरून पाणी गेल्याने लोक अडकून पडले होते. सायंकाळी ७ नंतर पाणी ओसरल्यावर वाहने व लोक पलीकडे गेले. पाली व जांभूळ पाडा आंबा नदीवरील पुलाचे काम धीम्या गतीने होत आहे, जनतेला या पुलां ची प्रतीक्षा आहे. सततच्या त्रासाला नागरिक कंटाळले.

पेण वरून पालीला मासळी विक्री करण्यासाठी येणाऱ्या गौरी मनोरे यांनी सांगितले की मासळी विक्री करण्यासाठी जिथे बसतो तिथपर्यंत पाणी आले होते. त्यामुळे पालीतील एका ओळखीच्यांकडे राहिलो. रात्री साडेअकरा नंतर .../२

## आपत्तीग्रस्त सहा जिल्ह्यांत मोफत शिवभोजन थाळीच्या इष्टांकात दुप्पट वाढ : छगन भुजबळ

**नाशिक : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात विविध भागात अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले आहे. महापुरामुळे विशेषत: महाराष्ट्रातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली आणि कोल्हापूर या सहा जिल्ह्यांना मोठा फटका बसला आहे. यात सर्वसामान्य जनतेचे मोठे नुकसान झाले आहे. या भागातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी घरे, शेती आणि रस्ते वाहून गेले आहेत. अनेक ठिकाणी घरे अजूनही पाण्याखाली आहेत. अशा पूरग्रस्तांना मदत म्हणून राज्य शासनाकडून मोफत अन्न-धान्य आणि केरोसीनचे वाटप केले जाणार असल्याची माहिती राज्याचे अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ यांनी



आज नाशिक येथील कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. त्याचबरोबर या आपत्तीग्रस्त भागात मोफत शिवभोजन थाळीच्या इष्टांकात दुप्पट वाढ करण्यात आली आहे. याबाबत आज तातडीने आदेश काढण्यात येणार असून आदेशाची वाट न बघता तातडीने मदत कार्य सुरु करण्यात यावे असे यावेळी छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले आहे. .../२

## कळंबोली येथे न्याय हक्कासाठी लढा; पनवेल मनपाचे सभागृहनेते आणि महिला व बालकल्याण सभापती यांचा पाठींबा

### व्यवस्थापनाने नमते धोरण घेत मागण्या केल्या मान्य

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली येथील मॅकडोनाल्ड हॉटेलमध्ये व्यवस्थापकाच्या मनमानीला कंटाळून शुक्रवारी कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले. जोपर्यंत संबंधिताची बदली होत नाही तोपर्यंत काम करणार नाही अशा प्रकारची भूमिका आंदोलकांनी घेतली. पनवेल मनपाचे सभागृहनेते परेश ठाकूर आणि महिला व बालकल्याण सभापती मोनिका महानवर यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना पाठिंबा देऊन व्यवस्थापनाला जाब विचारले त्यानुसार मागण्या मान्य करण्यात आल्या.



कळंबोली येथे मॅक्डोनाल्ड हॉटेलमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना व्यवस्थापकडून त्रास दिला जातो होता. त्यांच्या वेतनामध्ये कपात करणे. वेळेच्या अगोदर कामावर बोलवणे. जास्त वेळ काम करुन घेणे त्याचबरोबर इतर अनेक प्रकारे त्रास संबंधित .../२

## को.ए.सो.विद्या संकुलात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

### माजी विद्यार्थी आणि विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी घेतले प्राचार्यांचे आशिर्वाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

को.ए.सो विठोबा खंडाप्पा शाळेला तसेच इंदूबाई वाजेकर शाळा, केशवजी विरजी कन्या शाळा व व्ही.के. ज्युनियर कॉलेजला विरोधी पक्षनेते प्रीतम जनार्दन म्हात्रे यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त भेट देऊन शालेय शिक्षकांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या!

आपल्या शिक्षणाच्या तालमीत तयार झालेल्या विद्यार्थ्याची त्यांच्या सामाजिक क्षेत्रातल्या कार्यामुळे आज शाळा समिती सदस्यपदी निवड झाली हेच आम्ही विद्यार्थ्यांवर घडविलेले संस्कार आहेत भविष्यात तुमची अशीच प्रगती होवो असे शब्दरूपी आशीर्वाद प्राचार्यां पी.बी.ठाकूर



सर यांनी दिले.

को. ए. सो. व्ही. के. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय पनवेल यांनी इ.१० वीच्या निकाला नंतर को.ए.सो. विद्यासंकूल पनवेल च्या व्ही.के. हायस्कूल, के.व्ही. कन्या शाळा, व इंदूबाई वाजेकर इंग्रजी माध्यम शाळा या शाळेमधील इयत्ता १० वी पास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी उएढ परीक्षा व ११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया बाबत विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन सभांचे आयोजन .../२

## मराठा आरक्षणाला गती, अशोक चव्हाणांचे सर्वपक्षीय खासदारांना पत्र

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्रातील सर्वपक्षीय खासदारांनी संसदेच्या पावसाळी अधिवेशनात आरक्षणाची ५० टक्के मर्यादा शिथिल करण्याची मागणी करून पाठपुरावा करावा आणि मराठा आरक्षणासाठी योगदान व सहकार्य द्यावे, असे आवाहन सार्वजनिक बांधकाममंत्री तथा मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी केले आहे.



चव्हाण यांनी शनिवारी राज्यातील सर्व पक्षांच्या लोकसभा व राज्यसभा सदस्यांना ईमेल तसेच कुरियरमार्फत पत्र पाठवले असून, या पत्रात त्यांनी मराठा आरक्षण देण्यासाठी ५० टक्के आरक्षण मर्यादा शिथिल करण्याची आवश्यकता विषद केली आहे. मराठा आरक्षण प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने ५ मे २०२१ रोजी दिलेला निकाल व त्या अनुषंगाने निर्माण झालेली कायदेशीर परिस्थिती त्यांनी आपल्या पत्रात नमूद केली आहे. १०२ व्या घटना दुरुस्तीबाबत केंद्र सरकारची पूनर्विलोकन याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतर सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास घटक जाहीर करण्याचे अधिकार पुनःश्च राज्यांना बहाल करण्यासाठी केंद्र सरकार सध्या सुरू असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विधेयक आणण्याची शक्यता आहे. परंतु, एसईबीसी जाहीर करण्याचे अधिकार केंद्र वा राज्य कोणाकडेही असले तरी आरक्षणाची ५० टक्के मर्यादा कायम राहिल्यास मराठा आरक्षण तसेच देशातील बहुतांश राज्यांना नवीन आरक्षण देणे शक्य होणार नाही. कारण तेथील आरक्षणे अगोदरच ५० टक्क्यांच्या वर गेलेली आहेत. ही परिस्थिती लक्षात घेता, केंद्र सरकारने .../२


# धक्कादायक आणि दुर्दैवी

महाराष्ट्रात किमान दहा ठिकाणी दरडी कोसळून ऐंशीच्या वर प्राण गेले आहेत. लागोपाठ दोन दिवस निसर्गाने जो महाभयंकर तडाखा दिला, त्यातील बळींचा आकडा १३०च्या घरात गेला आहे. पावसाच्या तडाख्याचा महाराष्ट्र आणि विशेषकरून कोकणपट्टी गेल्या काही वर्षांत वाढता सामना करीत आहे. तरीही, कोकणातील तसेच सातारा जिल्ह्यातील यावेळच्या या दुर्घटना भयंकर आहेत. कोकणातील रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये हे दरडबळी गेले आहेत. रायगड जिल्ह्यातील तळीये या गावातली दुर्घटना सगळ्यांत मोठी तर आहेच; पण तिथे प्राथमिक मदत मिळण्यासही उशीर झालेला दिसतो. शुक्रवारी लष्करासहित सारी मदतदले आता मैदानात उतरली असली तरी त्यालाही बराच विलंब झाला आहे. दरडी कोसळण्याचे हे भूभाग पाहिले तर हे प्रकार सह्याद्री पर्वतरांगेच्या जवळपास घडले आहेत. आता राज्य सरकारने मृतांच्या नातलगांना प्रत्येकी पाच लाखांची मदत जाहीर केली आहे; तसेच, जखमींना मोफत औषधे व उपचार देण्यात येणार आहेत. ही तातडीची मदत असली तरी दरड कोसळलेल्या सर्व जिल्ह्यांमधील या सर्व रहिवाशांची गावे, वाड्या, वस्त्या जर इतक्या अपघातप्रवण असतील तर त्यांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाचा मुद्दा सरकारला लवकर हाती घ्यावा लागेल. तसा तो घेतला नाही तर कोकणात तसेच देशावरही अशा घटना भविष्यात घडू शकतात. शुक्रवारी निसर्गाने महाराष्ट्रावर मृत्यूंचा हा जो घाला घातला आहे, तो इशारा देणारा आहे. हा इशारा ऐकला नाही तर त्याची फार मोठी किंमत भविष्यात मोजावी लागेल. आत्ता साऱ्या जखमींना मदत देणे, पडलेली घरे सावरणे, पुरानंतर साथींचे रोग येऊ न देणे आणि मृतांच्या नातलगांना भरपाई देणे, हे काम प्राधान्याने करावयाचे आहे. करोनासाठी उपचार घेणाऱ्यांचाही मृत्यू या नैसर्गिक आपदेत व्हावा, यासारखे तर दुर्दैव नाही. मात्र, हे सारे का घडते आहे आणि त्यावरचा दीर्घपल्ल्याचा उपाय काय करावयाचा आहे, याचा विचार आजच करायला हवा. आज जगावर नजर टाकली तर युरोपसहित इतर खंडातील अनेक देशांमध्ये भयंकर अतिवृष्टी होत आहे. भारतातही आपण ती अनुभवतो आहोत. या अतिवृष्टीत पावसाचा जो जोर असतो, त्यामुळे शेतजमीन, डोंगर, नदीकाठ आणि जागोजागची माती यांची कितीतरी तीव्र हानी होते. या पावसाच्या माऱ्याच्या तीव्रतेमुळे दरडी कोसळतात, कडे निखळतात आणि पाण्याच्या प्रचंड ताकदीने हजारो टन गाळ वाहून नेला जाऊन तोही प्राणघातक ठरतो. ज्येष्ठ वैज्ञानिक माधवराव गाडगीळ यांनी पश्चिम घाटासंबंधीचा जो विस्तृत आणि शास्त्रीय अहवाल दिला होता; त्याची विकासविरोधी म्हणून वासलात लावण्यात साऱ्या राजकारण्यांनी भूषण मानले. मात्र, निसर्ग, पर्यावरण आणि मानवी वसाहती यांचा समतोल साधला न गेल्यामुळेच या दरडी कोसळण्याच्या घटना प्राणघातक ठरत आहेत. साऱ्या जगाचे हवामान बदलत असताना चिंचोळ्या कोकण किनारपट्टीला पुढच्या पाच दशकांमध्ये निसर्गाचा काय व किती फटका बसू शकतो, याचा शास्त्रीय अभ्यास करून गरज पडल्यास गावे, वाड्या-वस्त्या हलवून सुरक्षित ठिकाणी न्याव्या लागतील. सह्याद्रीच्या कोकणभागाकडे जसे हे करावे लागेल, तसेच सह्याद्रीच्या देशावरच्या भागाकडेही हेच करावे लागणार आहे. सातारा जिल्ह्याच्या पाटण तसेच वाई तालुक्यांमधील अनेक गावांमध्ये दरड कोसळून ज्या दुर्घटना झाल्या आहेत, त्यांचाही अर्थ सह्याद्रीचा कोप हाच आहे. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातल्या बहुतेक नद्या आपली पूर्वीची कमाल पूररेषा ओलांडून नवे विक्रम करीत आहेत. हा जसा वाढीव पावसाचा परिणाम आहे; तसाच तो आपल्या चुकांचाही परिणाम आहे का, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. यात जागोजागचे अपुरे जलसंधारण, धरण व्यवस्थापन, बेबंद वृक्षतोड, नद्यांची उथळ व बेछूट वाळूउपसा होणारी पात्रे या साऱ्यांचा काय व किती संबंध आहे, हे प्रश्न आजच विचारणे आवश्यक आहे. ते विचारले नाहीत तर महाराष्ट्रात अशा शोकांतिका पुन्हा पुन्हा होत राहतील आणि राज्यकर्ते तात्पुरते उपाय योजून डोळ्यांवर कातडे ओढून पुढच्या शोकांतिकेपर्यंत ढिम्म बसतील. अशा दुर्घटना होतात, तेव्हा माणसे कोलमडून जातात. कुटुंबे उघड्यावर पडतात. मुले निराधार होतात. सारे समाजमन डहुळते. काळवंडून जाते. अशावेळी, या साऱ्यांना आधार देणे, हे सरकारचे व समाजाचे कर्तव्यच आहे. ते काम चालू झाले आहे. ते वेगाने व्हायला हवे. मात्र, या संकटातून महाराष्ट्रासमोर जे दूरगामी आणि मूलभूत प्रश्न उभे राहिले आहेत; त्यांचाही विचार करण्याची हीच वेळ आहे. एखादी दरड कोसळून प्राण जातात, तेव्हा ते नैसर्गिक संकट असते. मात्र, दहा दहा ठिकाणी दरडी कोसळून इतके प्राण जातात आणि गावे उद्ध्वस्त होतात, तेव्हा 'आपलेही काही चुकते आहे का' हा विचार करणे आवश्यक आहे.

# जेष्ठ कवी सतीश काळसेकर यांचे पेण येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण येथील जेष्ठ कवी, प्रगतीशील लेखक सतीश काळसेकर यांचे आज पहाटे चित्रकुटीर, आंबेगाव-पेण येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. ते बडोदा बँकेतून निवृत्त झाले होते. हिमालयातील अनेक प्रवास आयोजित करण्यात त्यांनी सतत पुढाकार घेतला होता. निसर्गप्रेमी ही त्यांची खास ओळख होती. त्यांच्या निधनाने प्रगतीशील साहित्य, सांस्कृतिक चळवळीचे खूप मोठे नुकसान झाले आहे. मराठी साहित्यातील कवी, संपादक, अनुवादक, लघुनियतकालिकांच्या चळवळीतील अग्रणी कार्यकर्ते, मार्क्सवादी चळवळीतील ते सक्रिय कार्यकर्ते होते.



काळसेकर यांचा जन्म वेंगुर्ले, जि.सिंधुदुर्ग येथे झाला. त्यांचे मूळगाव काळसे ता.मालवण जि.सिंधुदुर्ग हे आहे. त्यांच्या शालेय शिक्षणास सुरुवात प्राथमिक शाळा काळसे ता.मालवण, सिंधुदुर्ग या शाळेत झाली. शाळेत त्यांना थेट इयत्ता तिसरीमध्ये प्रवेश देण्यात आले होते. तेथे त्यांनी तिसरी ते सातवीपर्यंतचे शिक्षण घेतले. यानंतर इयत्ता आठवीचे शिक्षण सोशल सर्विस लीग मुंबईच्या नाईट हायस्कूलमध्ये तर नववी, दहावी व अकरावीचे शिक्षण वालावल हायस्कूल, वालावल ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग येथे घेतले. भवन्स महाविद्यालय, मुंबई येथून बि.ए.(ऑनर्स) केले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर काही काळ मासिक ज्ञानदूत व टाइम्स ऑफ इंडिया मध्ये त्यांनी नोकरी केली. यानंतर त्यांना बँक ऑफ बडोदा येथे नोकरी लागली. १९६५ ते २००१ म्हणजे सेवानिवृत्ती पर्यंत ते बँक ऑफ बडोदा येथे कार्यरत होते.

काळसेकर यांच्या वाङ्मयीन कारकिर्दीची सुरुवात काव्य लेखनाने झाली. सुरुवातीला महाविद्यालयाच्या नियतकालिकातून, नवा-काळ, मराठा यासारख्या वर्तमानपत्रातून त्यांच्या कविता प्रसिद्ध झाल्या. त्यानंतर विविध वाङ्मयीन नियतकालिकांतून त्यांच्या कविता प्रसिद्ध होत होत्या. १९७१ मध्ये त्यांचा पहिला कवितासंग्रह इंद्रियोपनिषद् प्रकाशित झाला. या कविता संग्रहापासूनच कवी म्हणून त्यांची ओळख ठळक होत गेली. काळसेकर यांची साहित्य संपदा इंद्रियोपनिषद् (१९७१), साक्षात (१९८२), विलंबित (१९९७) हे कवितासंग्रह तसेच कविता: लेनिनसाठी (१९७७), लेनिनवरच्या विश्वातील कविता-अनुवाद व संपादन), नव्या वसाहतीत (२०११), अरुण कमल यांच्या हिंदी कवितासंग्रहाचा मराठी अनुवाद) हे अनुवाद प्रकाशित झाले आहेत. वाचणार्यायची रोजनिशी (२०१०), पायपीट (२०१५) हे त्यांचे गद्यलेखन प्रकाशित आहे. मी भयंकराच्या दारात उभा आहे (नामदेव ढसाळ यांची कविता, संपादन - प्रज्ञा दया पवारसह, २००७), आयदान: सांस्कृतिक ठेवा ( संपादन- सिसिलिया कार्व्हालोसह, २००७), निवडक अबकडइ (संपादन- अरुण शेवतेसह, २०१२) ही त्यांनी केलेली संपादने प्रकाशित आहेत.

सतीश काळसेकर यांच्या कवितांचा समावेश अनेक महत्त्वाच्या संकलनात झाला आहे. हिंदी, बंगाली, मल्याळम, इंग्रजी, पंजाबी यासह अन्य भारतीय भाषांत त्यांच्या कवितांचे अनुवाद झाले आहेत. त्यांनी देशी-विदेशी भाषांतील अनेक महत्त्वाच्या कवींच्या कवितांचे मराठी अनुवाद केलेले आहेत. महाश्वेता देवी आणि रस्किन बाँण्ड यांच्या कथांचे मराठी अनुवाद केले आहेत. 'अत्त दीप भव' (वृत्तमानस), 'वाचणाऱ्याची रोजनिशी' (आपले वाङ्मय वृत्त) हे त्यांचे सदर लेखन प्रकाशित आहे. प्रवास लेखन, सांस्कृतिक चळवळी, खाद्यजीवन या सारख्या विषयांवर त्यांनी वेळोवेळी केलेले लेखन नियतकालिकांतून, वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले आहे.

लघुनियतकालिकांच्या चळवळीत त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. नवसाहित्याची सुरुवात करणाऱ्या या चळवळीतील ते अग्रणी कार्यकर्ते होते. काळसेकर यांनी मागोवा, तात्पर्य, लोकवाङ्मय , फक्त, तापसी, चक्रवर्ती आणि आपले वाङ्मय वृत्त इत्यादी नियतकालिकांची संपादकीय जबाबदारी सांभाळलेली आहे. मराठी प्रकाशनाच्या क्षेत्रातील लोकवाङ्मय गृह, मुंबई या प्रकाशन संस्थेच्या संपादनाचे कार्य त्यांनी केले आहे. याशिवाय अभिनव प्रकाशन या प्रकाशन संस्थेतही त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. त्यांनी साहित्य अकादमीच्या मराठी भाषा सल्लागार समितीचे सदस्यत्व (१९९८-२००२), महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) च्या भारतीय पुरस्कार निवड समितीचे दहा वर्ष सभासदत्व (१९९४-२००३), आणि २००८ पर्यंत निवड समितीचे निमंत्रक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्यत्व (डिसेंबर २००५ ते डिसेंबर २०११) या जबाबदाऱ्या सांभाळलेल्या आहेत.

काळसेकर मार्क्सवादी विचारसरणीच्या चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते होते. डाव्या विचारसरणीच्या ऑल इंडिया बँक एम्प्लॉइज असोसिएशनचे ते सदस्य होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे उभारण्यात आलेल्या वेगवेगळ्या आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला. समांतर लेखक संघात ते कार्यशील होते. अखिल भारतीय प्रगतिशील लेखक संघाचे ते महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणीचे अध्यक्ष होते तसेच आजही ते या संघटनेत कार्यरत आहेत. त्यांना त्यांच्या वाङ्मयीन कार्यासाठी सोव्हिएत लँड नेहरू पारितोषिक (१९७७), लालजी पेंडसे पुरस्कार (१९९७), बहिणाबाई पुरस्कारः कवी (१९९८), कविवर्य कुसुमाग्रज पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद (१९९८), महाराष्ट्र शासन पुरस्कार (१९९९), कैफी आझमी पुरस्कार (२००६), महाराष्ट्र शासनाचा कृष्णराव भालेकर पुरस्कार (२०१०-२०११), सार्वजनिक वाचनालय, बेळगाव या संस्थेतर्फे दिला जाणारा आचार्य अत्रे साहित्य पुरस्कार (२०१३), साहित्य अकादमी पुरस्कार (२०१३), महाराष्ट्र फाऊंडेशन ग्रंथ पुरस्कार (२०१८) इत्यादी पुरस्काराने सन्मानित होते.

# पूरग्रस्तांच्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करावे : बाळासाहेब पाटील

**दै.रायगड नगरी । मुंबई**

तारळी धरणाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे तारळी नदीला पूर आला. या पुराची पाणी गावात शिरल्याने दुकानांची तसेच घरांची मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करा. पूरग्रस्तांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असल्याचे आश्वासन पालकमंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिले. पाली ता. कराड येथील पूर परिस्थितीची पाहणी पालकमंत्री श्री. पाटील यांनी केली. यावेळी ते बोलत होते. यापाहणी प्रसंगी कराडचे प्रांताधिकारी उत्तम दिघे, तहसिलदार अमरदिप वाकडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. पूरामुळे पाली येथील पूलाचे नुकसान झाले आहे. या पुलाची तात्काळ दुरुस्ती करुन पूल वाहतुकीसाठी खुला करावा. गेल्या तीस ते पस्तीस वर्षात पाली येथे झालेला मोठा पाऊस आहे. पाटण तालुक्यातील विरगाव येथे भूस्खलन झालेल्या गावात बचावकार्य कोयनेच्या बॅकवॉटरमधुन सुरु करण्यात आले आहे. तसेच आंबेघर येथे एनडीआरएफची टीम आज सकाळी पोहोचली असून मदतकार्य सुरु केले आहे. कोयनाधरणातून पाण्याचा विसर्ग कमी करण्यात आला आहे. ज्या गावांमध्ये भूस्खलन झाले आहे. त्या गावामध्ये प्रशासनाबरोबर स्वयंसेवी संस्थाही काम करीत असल्याचे पालकमंत्री श्री. पाटील यांनी सांगितले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## तब्बल ८ तास हाल, खोळंबा, कोंडी आणि संताप

पुलावरील पाणी ओसरल्यावर रिक्षाने घरी निघालो. रात्री दीड वाजता पेणला घरी पोहोचलो. दरम्यान खूप हाल झाले. घरी दोन लहान मुले आतुरतेने वाट पाहत होते. पालीतील किरणामाल दुकानात काम करणारा गोविंद बांगारे याने सांगितले की पालीपासून १० किलोमीटरवर गाव आहे. पुलावरून पाणी गेल्याने मालकांच्या घरी थांबलो आणि रात्री १२ वाजता घरी पोहोचलो. तर अभिजित देशमुख यांनी संगितले की इंदापूर येथून कामावरून सायंकाळी पालीला निघालो मात्र पुलावर पाणी असल्याने काही वेळ थांबलो आणि माघारी फिरून कोलाडला मावशीकडे रात्र काढली. सुशील शिंदे हे अभियंते म्हणाले की ड्युटी संपल्यावर रोह्यावरून पालीला घरी निघालो. पण पुलावरून पाणी जात असल्याने एका हॉटेलचा आसरा घेतला आणि रात्री उशिरा घरी गेलो. वारंवार असे घडते त्यामुळे संताप होतो असेही शिंदे म्हणाले. अशा प्रकारे असंख्य लोक अन्नपाण्यावाचून तिष्ठत राहिले होते. ही परिस्थिती जाण्यासाठी येथील पूल लवकर बनविण्यात यावेत असे सम्यक क्रांती विचार मंचाचे अध्यक्ष मंगेश वाघमारे यांनी संगितले.

गुरुवारी (ता.२२) सकाळी साडेसात नंतर पाली अंबा नदी पुलावरून व १२ नंतर जांभूळपाडा अंबा नदी पुलावरून पाणी गेल्याने वाहतूक पुन्हा ठप्प झाली होती. वाकण पाली खोपोली मार्ग मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग, मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग व मुंबई बैंगलोर जोडतो तसेच दक्षिण कोकणातून पुणे व मुंबईला मुंबई-पुणे द्रुतगतीमार्गाने जाणारे प्रवाशी व वाहने याच मार्गावरून जातात. परिणामी येथील पाली व जांभुळपाडा अंबा नदी पुलावरून पाणी गेल्यास वारंवार प्रवाशी व वाहने दोन्ही बाजूस अडकून राहतात व त्यांची गैरसोय होते.

## मोफत शिवभोजन थाळीच्या इष्टांकात दुप्पट वाढ

यावेळी बोलताना मंत्री छगन भुजबळ म्हणाले, अतिवृष्टीचा फटका महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना बसला आहे. राज्यावर आलेल्या नैसर्गिक संकटाशी लढताना राज्य सरकार हे खंबीरपणे जनतेच्या पाठीमागे उभे आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली आणि कोल्हापूर या सहा पूरग्रस्त जिल्ह्यांमध्ये शिवभोजन थाळीचा इष्टांक दुप्पट करण्यात आला आहे. म्हणजेच या आपत्तीग्रस्त भागातील शिवभोजन केंद्रावर आत्ता दुप्पट क्षमतेने शिवभोजन थाळीचे वितरण केले जाणार आहे.

पूर परिस्थीतीमुळे अनेक जिल्ह्यांत वीज नाही अशा ठिकाणी मोफत केरोसीनचे वाटप करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी शिवभोजन केंद्र वाहून गेले आहे किंवा पाण्यात आहे तेथे इतर ठिकाणावरून शिवभोजनाचे पाकिटे वितरित करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. पाकिटांच्या वितरणासाठी त्याचप्रमाणे लाईट नसलेल्या ठिकाणी किंवा शिवभोजन अँपसाठी कनेक्टिव्हिटी नसलेल्या ठिकाणी थाळीच्या नोंदणीसाठी स्थानिक पातळीवर तहसीलदारांनी त्यांच्या यंत्रणेचा वापर करावा अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

या सहा आपत्तीग्रस्त जिल्ह्यात प्रति कुटुंब १० किलो गहू, १० किलो तांदूळ आणि पाच लिटर केरोसीनचा मोफत पुरवठा केला जाणार आहे. राज्यातील अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या आपद्ग्रस्तांना अन्नधान्य वाटप करण्याबाबतच्या ८ मार्च २०१९ च्या शासन निर्णयानुसार ही मदत दिली जाणार असल्याची माहिती भुजबळ यांनी दिली आहे.

त्याचप्रमाणे गहू नको असेल त्यांना गव्हाऐवजी तांदूळ दिले जातील. प्रत्येक कुटुंबाला ५ किलो डाळ देण्याबाबत सुद्धा निर्णय घेण्यात आला आहे.यावेळी बोलताना मंत्री भुजबळ यांनी राज्यात विविध ठिकाणी अतिवृष्टीमुळे दुर्दैवाने काही नागरिकांना दुर्घटनांमध्ये आपला जीव गमवावा लागला आहे. त्या मृतांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी असल्याची भावना व्यक्त करतानाच मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## कळंबोली येथे न्याय हक्कासाठी लढा

व्यवस्थापक कर्मचाऱ्यांना देत होता. काही दिवसांपूर्वीच त्याची या ठिकाणी बदली झाली होती. येथे काम करणारे सर्व कर्मचारी हे स्थानिक असल्याने परप्रांतीय व्यवस्थापक हेतुपुरस्सर त्यांच्यावर अन्याय करीत होता. यासंदर्भात व्यवस्थापनाला तक्रार केल्यानंतरही त्याच्यावर कोणतीच कारवाई होत नव्हती. या सर्व गोष्टींचा विचार करून या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी सायंकाळी कामबंद आंदोलन केले. विशेष म्हणजे सभागृह नेते परेश ठाकूर, महिला व बालकल्याण सभापती मोनिका प्रकाश महानवर, भाजपचे कळंबोली मंडल अध्यक्ष रवीनाथ पाटील, युवा नेते रामदास महानवर यांनी उपस्थित राहून संबंधित कामगारांना पाठिंबा दिला. यासंदर्भात त्यांनी व्यवस्थापनाशी ही चर्चा केली.

अशाप्रकारे व्यवस्थापक मग्रूर पणाचे वर्तन करत असेल, त्याचबरोबर जाणून-बुजून कर्मचाऱ्यांना त्रास देत असेल तर संबंधित व्यवस्थापकाची इतरत्र बदली करण्यात यावी अशा प्रकारची मागणी परेश ठाकूर आणि मोनिका महानवर यांनी केली. यासंदर्भात व्यवस्थापनाने नमते धोरण घेत कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या. परेश ठाकूर यांनी मध्यस्थी करीत सर्व कर्मचाऱ्यांना पुन्हा कामाला सुरुवात करण्याची विनंती केली. असाच प्रकार पुन्हा जर सुरु राहिला तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी कर्मचाऱ्यांच्या वतीने देण्यात आला.

## गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

केले होते. यावेळी , सीईटी परीक्षा व ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिये बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले यासाठी आय टी विभागाचे प्रमुख संतोष भोईर सर, जेष्ठ शिक्षक ए.बी.पाटील सर, इ.१० वीचे वर्ग शिक्षक दिपक वावेकर सर, एच बी पाटील, एस एम.धुमाळ, स्नेहल ठाकूर ,.शशिकला जाधव, सौ.रचिता पाटील तसेच आय.टी.शिक्षक श्री.वैभव पाटील. सौ.अपर्णा भोयर यांनी विशेष मेहनत घेतली.

या मार्गदर्शना साठी शाळेचे चेअरमन शिक्षक आमदार बाळाराम पाटील व शाळा समितीचे सदस्य प्रितम म्हात्रे यांच्या प्रेरणेतून हे मार्गदर्शन करण्यात आले असे शाळेचे मुख्याध्यापक पी.बी.ठाकूर यांनी आवर्जून सांगितले.

## मराठा आरक्षणाला गती

एसईबीसी जाहीर करण्याचे केवळ अधिकार राज्यांना देणे पुरेसे नाही, तर विविध न्यायालयीन निवाड्यांमध्ये नमूद असलेली आरक्षणाची ५० टक्के मर्यादा आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करून शिथिल करणे महत्त्वपूर्ण आहे. मराठा आरक्षण देण्याच्या अनुषंगाने हे आवश्यक असल्याचे अशोक चव्हाण यांनी खासदारांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

आरक्षण मर्यादा शिथिल करण्यासाठी राज्य शासनाने न्यायालयीन पातळीवर केलेल्या प्रयत्नांची माहितीही त्यांनी खासदारांना दिली आहे. परंतु, या प्रयत्नांना अद्याप यश मिळालेले नसल्याने आता केंद्र सरकारने याबाबत संसदेच्या पातळीवर विचार करणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी सरकारच्या शिष्टमंडळाने ८ जून २०२१ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नवी दिल्लीत घेतलेल्या भेटीमध्ये इंद्रा साहनी निवाड्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादेची बाधा व त्याचे परिणाम निदर्शनास आणून दिले. केंद्र सरकारने आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करून ५० टक्के आरक्षण मर्यादा शिथिल करावी, अशी मागणीही केली. मराठा आरक्षणासारख्या महाराष्ट्रातील महत्त्वाच्या मुद्यावर सहकार्य म्हणून राज्य शासनाला केंद्र सरकारकडून संसदेच्या पातळीवर उचित कार्यवाहीची अपेक्षा असल्याचे अशोक चव्हाण यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

मराठा आरक्षण देण्यासाठी इंद्रा साहनी व अन्य न्यायालयीन निवाड्यांमध्ये नमूद आरक्षणाची ५० टक्के मर्यादा संसदेत घटना दुरूस्ती करून शिथिल करण्यात यावी, अशी मागणी अशोक चव्हाण सातत्याने मांडत आले आहेत. राज्य विधिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात ५ जुलै २०२१ रोजी आरक्षणाची ५० टक्के मर्यादा शिथिल करण्याबाबत केंद्राला शिफारस करणारा ठराव मंजूर करण्यात आला होता.

त्यानंतर संसदेचे अधिवेशन सुरू झाल्यावर त्यांनी नवी दिल्ली येथे जाऊन राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे, माजी केंद्रीय गृहमंत्री व राज्यसभेवर महाराष्ट्रातून निवडून गेलेले खासदार पी. चिदंबरम, शिवसेना नेते संजय राऊत आदींची भेट घेऊन सदरहू विषय संसदेत मांडण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर त्यांनी आता सर्व खासदारांना पत्र लिहून या मोहिमेला अधिक गती दिली आहे.

# आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावण्यासाठी मूलभूत सोयी सुविधा पूर्ण करणार : पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे



**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात एकीकडे शहरीकरण वाढत असताना आदिवासी समाजाने आपले मातीशी असलेले नाते जपले आहे. मुंबईतील आरेचा ८०८ एकर परिसर जंगल घोषित झाल्याने येथील स्थानिक आदिवासींना सर्वाधिक आनंद झाला आहे. येथील रहिवाशांचे जीवनमान उंचावण्यासाठी ज्या मूलभूत सोयी सुविधा उभारणे गरजेचे आहे, त्या सर्व पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे प्रतिपादन पर्यावरण मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे यांनी केले आहे. आदिवासी बांधवांच्या उन्नतीकरिता शासन कटिबद्ध असल्याचा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी निरोप द्यायला सांगितल्याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना साहाय्य करण्यासाठी खावटी अनुदान योजनेअंतर्गत जीवनावश्यक अन्नधान्य किट वाटपाचा शुभारंभ श्री. ठाकरे यांच्या हस्ते आज करण्यात आला. याप्रसंगी आरे कॉलनीतील खांबाचा पाडा येथील ५२ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात या वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी खासदार गजानन कीर्तिकर, आमदार रवींद्र वायकर, सुनील प्रभू, जिल्हाधिकारी मिलिंद बोरीकर, प्रकल्प अधिकारी सुप्रिया चव्हाण आदी उपस्थित होते. खावटी अनुदान हे चार हजार रुपयांचे असून त्यात दोन हजार रुपयांच्या जीवनावश्यक वस्तू आणि दोन हजार रुपये बँक खात्यात जमा करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

श्री. ठाकरे म्हणाले, खावटी अनुदान वाटप हे आपले कर्तव्यच आहे. तथापि आरेमधील जंगल वाचविले, त्याचबरोबर येथील आदिवासींच्या उन्नतीसाठी काम करणे गरजेचे आहे. यासाठी वन विभाग आणि जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून नियोजन केले जाईल. वातावरणीय बदलांमुळे जगभर पर्यावरणाच्या समस्या निर्माण होत आहेत. महाराष्ट्रातही आपण विविध नैसर्गिक आपत्तींचा सामना करीत आहोत. अनेक ठिकाणी दरड कोसळून अपघात होत आहेत. त्याअनुषंगाने जेथे आवश्यक आहे तेथे संरक्षक भिंत बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही श्री. ठाकरे यांनी यावेळी सांगितले. तथापि, अधिक पाऊस पडत असल्याने रहिवाशांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी आदिवासींनी आरे परिसरात स्वतः पिकविलेल्या भाज्या तसेच तारपा वाद्य देऊन मंत्री श्री. ठाकरे यांचे स्थानिकांमार्फत स्वागत करण्यात आले.

# मृताचे नातेवाईक व वारसदारांना आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा कारागृह मध्ये बंदिस्त असलेल्या एका ७१ वर्षीय आरोपीचा जेजे रुग्णालयात आजारपणामुळे मृत्यू झाला आहे. सदर मृत व्यक्तीचे वारसदार व नातेवाईक आले नसल्याने मृतदेह राखून ठेवण्यात आला आहे. संबंधितांना खारघर पोलिसांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे. अब्दुल कलाम नूर इस्लाम शेख वय ७१ वर्षे बंदी एम बी ६६१/२१ असे मृत आरोपीचे नाव आहे. रूम नंबर १ बी १० मिल्लत नगर ओशिवरा अंधेरी पश्चिम असा ७ मृत व्यक्तीचा पत्ता आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## मिहीर परदेशीची राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नॅशनल युथ स्पोर्ट्स अँड एज्युकेशन फेडरेशन इंडियाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'तिसऱ्या नॅशनल युथ गेम्स चॅम्पिशियन २०२१' स्पर्धेत सीकेटी महाविद्यालयाचा विद्यार्थी मिहीर मदन परदेशी याने बॅडमिंटन स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावून सुवर्ण कामगिरी केली. त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मिहीरचा सत्कार करण्यात आला.

केंद्र सरकारच्या खेलो इंडिया, फिट इंडिया आणि मिनिस्ट्री ऑफ एमवायएएस यांच्या वतीने गोवा येथील नेहरू स्टेडियममध्ये नॅशनल युथ गेम्स चॅम्पियनशिप या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बॅडमिंटन स्पर्धेतील २० वर्षाखालील एकेरी गटात मिहीर परदेशी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्ण पदक पटकाविले. मिहीर चांगू काना ठाकूर महाविद्यालयाचा टीवाय बीकॉमचा विद्यार्थी आहे. शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रात त्याने केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. या कामगिरीबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य वसंत ब-हाटे, पुणे विद्या भवनचे प्रोफेसर दीपक निचित यांच्यासह अनेक मान्यवरांनी मिहीरचे अभिनंदन केले.

## लोखंडी पोलची अज्ञात चोरट्यांनी केली चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोखंडी पोलची अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना पनवेल तालुक्यात घडली असून एकूण १५७ लोखंडी पोल चोरीस गेल्याने या चोरट्याचा शोध पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे पथक करीत आहे.

बाविस्कर ग्रुप ऑफ कंपनी यांची वांगणी तर्फे तळोजे येथे एकूण १३४ एकर जमिन आहे. या जमिनीवर असलेले लोखंडी पोल व तारेच्या कुंपणापैकी १५७ लोखंडी पोलची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची तक्रार कंपनीच्या वतीने पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. त्यानुसार सदर चोरट्याचा शोध तालुका पोलिस करीत आहेत.

## श्रीमती अर्चना नारायण गळवे राज्यस्तरीय बेस्ट टीचर अवार्ड ने सन्मानित

**दै.रायगड नगरी । उरण**

कोविड १९ या संकटकालीन समयी शाळा बंद पण ऑनलाइन शिक्षण सुरू अशा परिस्थितीत लीप फॉर वर्ड या उपक्रमा अंतर्गत बहुवर्ग अध्यापनाच्या उपक्रम शिक्षिका श्रीमती अर्चना नारायण गळवे यांनी स्वयंस्फूर्तीने अथक अविरत प्रयत्नातून, केंद्रप्रमुख सौ सुप्रिया म्हात्रे यांच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली, मुख्याध्यापिका सौ. रंजीता परदेशी यांच्या अथक सहकार्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीस्तव प्रभावीरीत्या उपक्रम राबविण्यात आला. सदर उपक्रमा अंतर्गत लिप फोर वर्ड मुंबई संचालित राज्यस्तरावरून आलेले ई-लर्निंग सर्व प्रकारीय साहित्य पालक ग्रुप वर फॉरवर्ड करण्यात येत होते तथापि जिथे ऑनलाईन कार्य करण्यात अडचणी येत होत्या तिथे प्रत्येक घरोघरी जाऊन या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थी सेमीफायनल पर्यंत जाऊन पोहोचले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण बदल झाल्याचे दिसून आले.बेस्ट टीचर म्हणून निवड करण्यात आली.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# इतर मागासवर्गीय समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाच्या विविध योजना

राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाने शामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय आर्थिक विकास या महामंडळाची स्थापना केली आहे. समाजातील इतर मागासवर्गीयांच्या आर्थिक उन्नतीसाठी या महामंडळामार्फत स्वयंरोजगाराच्या विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. कोणत्या आहेत त्या योजना जाणून घेऊ या लेखाद्वारे !

छोटे व्यवसायिक व स्वयंरोजगाराकरिता रु.१ लाख ची थेट कर्ज योजना (नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याज नाही) व २० टक्के बीज भांडवल योजना. तसेच ऑनलाईन योजनांमध्ये वैयक्तिक कर्ज योजना परतावा योजना ( रु.१० लक्ष पर्यंत) गट कर्ज व्याज परतावा योजना (रु.१० लक्ष ते ५० लक्ष पर्यंत) या योजनांचा समावेश आहे.

सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरिताही या विविध कर्ज योजनांचे शामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाच्या रायगड जिल्हा कार्यालयास उद्दिष्टय प्राप्त झाले आहे.

थेट कर्ज योजना (भौतिक उद्दिष्ट १२०) व २० टक्के बीज भांडवल योजना (भौतिक उद्दिष्ट ६०) या योजनांचे अर्ज शामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय महामंडळाच्या रायगड जिल्हा कार्यालयात स:शुल्क उपलब्ध आहेत.

**रु.१ लक्ष थेट कर्ज योजना :- सिबिल क्रेडिट** स्कोर किमान ५०० असलेल्या लाभार्थ्यांना हे कर्ज महामंडळातर्फे दिले जाते. कर्ज परत फेडीचा कालावधी ४ वर्षे आहे. अर्जदाराच्या वयाची मर्यादा १८ ते २५ वर्षे आहे. कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याज आकारण्यात येणार नाही. मासिक हप्ता २ हजार ८५ रुपये आहे.

**२० टक्के बीज भांडवल योजना :-** कर्जाची उच्चतम मर्यादा रु. ५ लक्ष पर्यंत. कर्ज परतफेडीचा कालावधी ५ वर्षे आहे. अर्जदाराच्या वयाची मर्यादा वय १८ ते ५० वर्षे आहे. बँकेमार्फत लाभार्थ्यांना ७५ टक्के कर्ज उपलब्ध केले जाते. यामध्ये लाभार्थ्यांचा सहभाग ५ टक्के, महामंडळाचा सहभाग २० टक्के, बँकेचा सहभाग ७५ टक्के महामंडळाच्या कर्ज रकमेवर व्याजाचा दर ६ टक्के असतो.

**या योजनांसाठी लागणारी कागदपत्रे :-** पासपोर्ट साईज २ फोटो, तहसिलदार/नायब तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा मूळ दाखला. (ग्रामीण व शहरी भागासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लक्ष), सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र (इ.मा.व.), दरपत्रक (कोटेशन), प्रकल्प अहवाल, आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा निवडणूक ओळखपत्र शिधापत्रिकेची झेरॉक्स, सिबिल क्रेडिट रिपोर्ट थेट कर्ज योजनेकरिता (स्कोर किमान ५०० असावा), स्थानिक स्वराज्य संस्थेचे (ग्रामपंचायत/नगरपालिका) व्यवसाय करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र, डोमिसाईल किंवा रहिवासी दाखला, आधारकार्ड लिंक केलेल्या पासबुकची झेरॉक्स, वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र/ जन्मतारखेचा दाखला. भाडेकरार किंवा संबंधित जागामालकाचे संमतीपत्र व व्यवसायाच्या जागेचा असेसमेंट उतारा इत्यादी कागदपत्रे लागतात.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (भौतिक उद्दिष्ट १४०) व गट कर्ज व्याज परतावा योजना (भौतिक उद्दिष्ट २५) या योजनांकरिता महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल.

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु.१० लक्ष पर्यंत) :-** ही योजना संपूर्णपणे संगणीकृत आहे. या योजनेमध्ये बँकेने रु.१० लाखापर्यंतच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या अर्जदाराने कर्जाचे हप्ते नियमित भरल्यानंतर व्याजाची रक्कम (१२ टक्के मर्यादेत) अर्जदाराच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते.

या योजनेचा कालावधी ५ वर्षे असेल. या योजनेसाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० असावे, अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.८ लक्ष पर्यंत. (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार), कुटुंबातील एका व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराचे आधार संलग्न बँक खाते असणे अनिवार्य आहे. महामंडळाच्या www.msobcfdc.org (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणक संगणकीकृत सशर्त हेतूपत्र (Letter of Intent) दिले जाईल. अर्जदारास याआधारे बँकेकडून कर्ज मंजूर करून घ्यावे लागेल.

गट कर्ज व्याज परतावा योजना (रु. १० लक्ष ते ५० लक्ष पर्यंत) :- इतर मागासवर्गीय प्रवर्गातील महामंडळाच्या निकषानुसार विहित केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेतील उमेदवारांच्या बचतगट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी (कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत), LLP, FPO अशा शासन प्रमाणिकरण प्राप्त संस्थांना बँकेमार्फत स्वयंरोजगार उद्योग उभारणीकरिता जे कर्ज दिले जाईल, त्या कर्ज रकमेवरील व्याज परतावा बँक प्रमाणीकरणानुसार महामंडळाकडून अदा केला जाईल. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.८ लक्ष पर्यंत असलेल्या उमेदवारांच्या गटास बँकेकडून रु.१० लक्ष ते रु. ५० लाखापर्यंत मंजूर उद्योग उभारणी करता कर्ज उपलब्ध केले जाईल. गटातील सदस्यांचे वय १८ ते ४५ पर्यंत असावे. गटातील सर्व सदस्यांचा सिबिल क्रेडिट स्कोअर किमान ५०० इतका असावा. परतफेडीचा कालावधी- मंजूर कर्जावर ५ वर्षापर्यंत अथवा कर्ज कालावधी यापैकी जो कमी असेल तो. कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर (जास्तीत जास्त १२ टक्के व्याजदराच्या आणि रु.१५ लाखाच्या मर्यादेत) त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक या खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. महामंडळाच्या www.msobcfdc.org (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलवर गटाचा ऑनलाईन पद्धतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणकीकृत सशर्त हेतूपत्र (Letter of Intent) दिले जाईल. या गटास या आधारे बँकेकडून कर्ज मंजूर करून घ्यावे लागेल.

इच्छुक गरजू इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) प्रवर्गातील व्यक्तींनी योजनेच्या अधिक माहितीकरिता शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ लिमिटेडचे कार्यालय, श्री राम समर्थ निर्माण संस्था मर्यादित, फ्लॅट क्र. १०१ पहिला मजला, चेंढरे, अलिबाग (दू. क्र. ०२१४१-२२४४८८) येथे किंवा dmobcalibagraigadgmail.com या ईमेल पत्त्यावर संपर्क साधावा.

**मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**रायगड-अलिबाग**

## सीईटीसाठी अर्ज करणारी वेबसाईट हँग असल्याने पालक व विद्यार्थी संभ्रमात

**दै.रायगड नगरी । उरण**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदा दहावी आणि बारावीच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या होत्या. मात्र मूल्यांकनानुसार दहावीचा निकाल नुकताच घोषित करण्यात आला आहे. अकरावीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना सीईटी परीक्षा मात्र बंधनकारक करण्यात आली आहे. सीईटीचे अर्ज भरण्यासाठीची हँग झाली आहे. दहावीचा निकाल लागला त्यावेळीही वेबसाईट हँग झाली होती. आता पुन्हा सीईटीसाठी अर्ज करण्यासाठी वेबसाईट हँग झालेली असल्याने पालक आणि विद्यार्थी संभ्रमात सापडले आहेत.

राज्य सरकारने दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशासाठी सीईटी बंधनकारक केली आहे. विद्यार्थ्यांनी सीईटीचे अर्ज भरण्यासाठी तयारी सुरू केली आहे. मात्र वेबसाईट हँग झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा पुरता हिरमोड झालेला आहे. विद्यार्थ्यांना अंतर्गत मूल्यमापन करून गुण देण्यात आले आहे. मात्र या मूल्यमापनावर राज्यभरातून टीका झाली होती. त्यामुळे शिक्षण विभागाने अकरावी वर्गात प्रवेश घेणार्याड विद्यार्थ्यांसाठी सीईटी घेण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानुसार २१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते दुपारी १ च्या दरम्यान अकरावी सीईटी परीक्षा राज्यभरात घेतली जाणार आहे.

या सीईटीचे अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी संगणक केंद्रावर गर्दी केली आहे. मात्र, सीईटीचे अर्ज भरण्याची वेबसाइट हँग झाल्यामुळे विद्यार्थ्यांना अर्ज भरता आलेले नाही. या वेबसाईटवर तांत्रिक कारणास्तव संकेतस्थळ तात्पुरत्या वेळेसाठी बंद करण्यात आले आहे, असा मेसेज दिसत आहे. त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. याबाबत शासकीय पातळीवर चौकशी केली असता कोणताच अधिकारी वर्ग यावर ठोस अशी माहिती देत नाही. त्यात सीईटीसाठी अर्ज करण्याची मुदत २६ जुलै पर्यंत आहे. मुदत संपण्यास अवघे २ दिवस उरले असतानाही वेबसाईट सुरू होत नाही. त्यामुळे नक्की काय करायचे अशा संभ्रमात पालक व विद्यार्थी सापडले आहेत. तरी शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी या प्रकरणात लक्ष घालून तो निकाली काढावा अन्यथा वेबसाईट त्वरित सुरू करण्याची मागणी पालक वर्गाकडून जोर धरू लागली आहे.

### यशवंत घासे यांचा महाड दरडग्रस्तांना मदतीचा हात...

## पेण मधून ५०० फूड पॉकिट, अन्नधान्य साहित्य महाडला रवाना



**दै.रायगड नगरी । पेण**

कोकणासह रायगड जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडत असून महाड, पोलादपूर, हिरकणी कडा, सुतारवाडी, चिपळूण येथे पूर व दरड कोसळण्याच्या घटनेने अनेक कुटुंब उध्वस्त झाली आहेत. जोरदार पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. अश्या संकटात मदतीचे हात पुढे येत असून पेण येथील प्रसिद्ध उद्योजक यशवंत घासे यांनी पेण मधून ५०० फूड पॉकेट, अन्नधान्य साहित्य पेण प्रांत कार्यालयाकडे सुपुर्द करून महाडला रवाना केले आहेत.

अचानक आलेल्या पुरामुळे सर्वत्र पाणी भरले आहे. तर शासनाकडून बचाव कार्य सुरू आहे. पुरात अडकलेल्या नागरिकांना मदत करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येत आहे. त्याच आवाहनाला प्रतिसाद देत पेण येथील सारा कंट्रक्शनचे मालक तसेच प्रसिद्ध उद्योजक यशवंत घासे यांच्याकडून महाड येथील पूरग्रस्त तसेच दरडग्रस्तांना ५०० फुड पॉकेट, अन्नधान्य, ब्लँकेट, चादरी, कपडे आदी साहित्य पेण प्रांत कार्यालय अधिकार्यांयकडे सुपूर्द करून महाड येथे पाठविण्यात आले आहे.

## गुरुदक्षिणा म्हणून वनौषधी रोपे भेट-आर्या वनौषधीचा आगळा वेगळा उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून आर्या वनौषधी संस्थेच्यावतीने गुरुजनांना गुरुदक्षिणा म्हणून दुर्मिळ वनौषधी रोपे भेट देवून एक आगळी वेगळी गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली.



पर्यावरणाचा समतोल व येणाऱ्या पिढीचे भविष्य लक्षात घेवून एक सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम सुधीर पाटील आणि त्यांचे सहकारी करत आहेत. त्यांचे हे आगळेवेगळे उपक्रम खरोखरच खूपच कौतुकास्पद आहेत असे मत सी.के.ठाकूर विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी व्यक्त केले. यावेळी पत्रकार सुभाष वाघपंजे, एकता आवाज फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रम येलवे, पत्रकार अविनाश पाटील,दत्तू कोल्हे,आर्या वनौषधी संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील यांच्या हस्ते श्वेत मुसळी,विधारा,जंगली अद्रक, पांढरा चित्रक,लाल चित्रक,सीतेचे अशोक, लाल चंदन,कडू किराईत, गुडमार, दमवेल, पुनर्नवा,अग्निशिखा आदी दुर्मिळ रोपे गुरुजनांना भेट देण्यात आली.

आर्या वनौषधी संस्थेच्या या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे नागरिकांनी कौतूक केले.


## महाडमधील सार्वजनिक आरोग्याचे दृष्टीकोनातुन स्वच्छता अत्यंत महत्वाची

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

महाड मधे सध्या घरा-घरातील सर्व सामान, धान्य, कपडे अंथरुन-पांघरुन तसेच प्रत्येक दुकानातील धान्य माल कपडे सर्व सर्वच वस्तुंचा चिखल झाला आहे. व हे सर्व सामान साफसफाई करताना रस्त्यावर टाकण्या शिवाय दुसरा पर्याय येथिल महाडकरांकडे उरला नाही. अशा वेळी शहरात आणखी एकदोन दिवसात किंवा काही तासातच या सर्व वस्तुघाण कुजणार, आंबणार व दुर्गंधी पसरणार तसेच बुरशी तयार होऊन रोगराईला कारणीभूत ठरणार आहे. यामध्ये कोणाचाही दोष नाही परंतु वेळीच व लवकरात लवकर ही सर्व अनपेक्षित निर्माण झालेली घाण कचरा संकलन करुन त्याची विल्हेवाट लावण्यासाठी मदतीची गरज आहे.

यासाठी एखादी स्वतंत्र यंत्रणा नियोजन करुन जेसीबी ट्रॅक्टर च्या सहाय्याने येथुन हा कचरा हलविण्याचे काम करावे लागेल. अन्यथा सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. यासाठी त्वरीत मदतकार्य उभे करावे असे महाडकर पूरपिडितांचे म्हणने आहे. महाड मधिल नगरपालिका तसेच सर्व यंत्रणा मधिल कर्मचारी सफाईकामगार तसेच खाजगी, शासकिय कर्मचारी यांची घर-दारे महापूरात उध्वस्त झाली आहेत. त्यामुळे हे महाडकर स्वतः हतबल आहेत. त्यामुळे येथे लवकरात लवकर मदतकार्य करणे गरजेचे आहे. जेणेकरुन सार्वजनिक आरोग्य राखुन पुढील मदतकार्य करणे सोपे जाईल.

महाडकरांना आता खरी पिण्याचे पाणी व मेणबत्तीची गरज जास्त आहे. अनेकांशी तसेच प्रत्यक्ष पुरपिडीतांशी आम्ही संपर्क करुन माहीती घेतली असुन संपूर्ण महाडकरांची अवस्था दयनिय झाली असुन जिव वाचला हेच महत्वाचे झाले! असे बोलण्याशिवाय त्यांच्याकडे दूसरा पर्याय उरला नाही. पैसे आहेत पण बाजारात माल नाही. त्यामुळे एकही जण पूराच्या तडाख्यातून सूटला नाही. लोक स्वाभिमानी आहेत त्यामुळे ते बोलणार नाहीत. सहन करतील परंतु ही मदत सर्वानाच करावी लागेल. स्वच्छता अत्यंत महत्वाची असुन या ठिकाणी उपाययोजना तातडीने व्हावी अशी महाडकरांची अपेक्षा आहे. कृपया संबंधितांनी तसेच शासकिय यंत्रणानी लक्ष घालावे.



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक श्री.अतुलकुमार महेंद्र शहा यांच्याकडून कायम स्वरुपी खरेदी खताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : मालडुंगे, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. व हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ८२/२/अ/२ | १-५०-०० पो.ख.०-५०-०० एकूण २-००-०० पैकी ०-४५-०० या खरेदी क्षेत्राकरिता | ०.७१ | श्री.अतुलकुमार महेंद्र शहा |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२४/०७/२०२१

**सही/-**
**ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे**
**१४६, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६**
**मो.नं.९८९२२२२२५७**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिलाने कायम खरेदी खत/करारनामा करून प्रस्ताविक जमीन मालक १) श्री.बळीराम गोविंद पाटील, २) सौ.ताईबाई गोविंद पाटील, ३) सौ.भारती संजय वाघमारे, ४) सदानंद बाळाराम डुकरे, ५) मदन बाळाराम डुकरे, ६) नामदेव बाळाराम डुकरे या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिंचवली तर्फे वाजे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| चिंचवली तर्फे वाजे | ६४/४ | ०-३६-०० पो.ख.०-१०-०० एकूण ०-४६-०० | ८.५० |
| **एकूण क्षेत्रापैकी २८ गुंठे शेत मिळकतीच्या खरेदीखताबाबत जाहीर नोटीस** | | | |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आप आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.श्री.महेंद्र अनंता पाटील**
**शॉप नं.१०९, पनवेल महानगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट जवळ, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६**
**मो.नं.८८९८०४४६७८**

# माथेरानमध्ये शिवसेनेत मोठ्या प्रमाणावर इनकमिंग सुरूच ; स्वाभिमान संघटना पक्ष शिवसेनेत विलीन

**दै.रायगड नगरी । माथेरान**

शिव संपर्क अभियानाच्या चौथ्या टप्प्यात गुरुपौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर येथील स्वाभिमान संघटना पक्षाने शिवसेनेत प्रवेश केल्याने यापुढे इथली राजकीय समीकरणे मोठया प्रमाणावर बदलणार असल्याने आगामी काळ हा शिवसेनेसाठी योग्य दिशेकडे नेणारा ठरणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

दि.२३ रोजी जनसंपर्क कार्यालयात शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी आणि सम्पर्क प्रमुख प्रसाद सावंत यांच्या नेतृत्वाखाली माथेरान स्वाभिमान संघटनेचे अध्यक्ष तथा समर्थ कामगार सेनेचे अध्यक्ष सागर पाटील यांचा आणि स्वाभिमान संघटनेच्या सर्वच ४० पेक्षाही अधिक कार्यकर्त्यांचा जाहीर प्रवेश झाला आहे.

माथेरानच्या राजकीय इतिहासातला हा सर्वात मोठा राजकीय प्रवेश असल्याचं बोललं जातं आहे. सदर पक्ष प्रवेशासाठी नगरसेविका ऋजुता प्रधान, नगरसेवक प्रसाद सावंत, शिवसैनिक विकास पार्टे यांनी महत्वाची भूमिका पार पाडली.

सागर दीपक पाटील स्वाभिमान संघटना पक्ष अध्यक्ष यांसह सचिन पाटील, जितेश पार्टे, नागेश परेरा, दिनेश कदम, रितेश गायकवाड, संतोष गायकवाड, नेहाल चव्हाण, कल्पेश वाघेला, अजय वाघेला, शैलेश वाघेला, निखिल बहादूर, आकाश बहादूर, अक्षय बहादूर, सिद्धेश



पाटील, किरण रोड्रिंक्स, आशिष शेलार (मॉन्टी), राहुल चव्हाण, अतुल चव्हाण, प्रेम फाळे, जिमी रोड्रिंक्स, अमोल धोत्रे, महेश शिंदे, जिमी रोड्रिंक्स, नानु चव्हाण, किरण पांचाळ,

> विचारांची देवाणघेवाण असल्यास वैचारिक पातळीवर लोक आपसूकच एकत्रित येतात शिवसेना पक्षात आल्याने सर्वांना योग्य त्या प्रकारे न्याय दिला जाईल याबाबत दुमत नाही.कुठल्याही परिस्थितीत नगरपरिषदेवर पुन्हा एकदा सर्वांच्या सा-थीने भगवा तर फडकवणारच आहे यात शंकाच नाही.
>
> **मा.ना.स. पतसंसंस्था**
> **सचिव - योगेश जाधव**

जयेश पाटील, प्रथमेश पाटील, रामदास सोनावळे, तेजस रोड्रिंक्स, रवी लोटनकर, निलेश चव्हाण, रितेश शिंगे, संकेत रोड्रिंक्स यांनी शिवसेनेचे शिवबंधन बांधून सदस्यत्व स्वीकारले यावेळी समर्थ कामगार सेनेचे कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.यावेळी प्रसाद सावंत यांनी मार्गदर्शनपर आपले अनमोल विचार प्रकट केले. विशेष म्हणजे स्वाभिमान संघटनेचे सर्वेसर्वा हे राज्यात भाजपवासी झालेले असताना माथेरान मध्ये कार्यरत असणाऱ्या याच संघटनेच्या पदाधिका–यांनी केवळ शिवसेनेची माथेरान मधील कार्यपद्धती आणि काही वर्षे प्रसाद सावंत यांच्या संपर्कात राहून सर्व काही अगदी जवळून पाहिले आहे त्यामुळे स्वाभिमान संघटना अध्यक्ष सागर पाटील यांनी स्वेच्छेने आपल्या संघटनेतील सर्व कार्यकर्त्यांसह विविध प्रभागातील जवळपास चाळीस पेक्षाही अधिक मित्र मंडळींना सोबत घेऊन जाहीररीत्या शिवसेनेचे सदस्यत्व स्वीकारले आहे.त्यामुळे सर्व शिवसैनिकांनी त्यांचे जोरदार स्वागत केले आहे. यावेळी आजी माजी नगरसेवक,शिवसैनिक आदी उपस्थित होते.

> आम्ही बारा ते पंधरा वर्षांपासून स्वाभिमान संघटनेचे काम करीत होतो परंतु आम्हाला काही चांगल्याप्रकारे कामे करण्याची संधी उपलब्ध झाली नाही. आमच्या संघटनेने लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीत शिवसेनेलाच मदत केली होती. गावात शिवसेना हाच एकमेव पक्ष आहे जो आमच्या सर्व कार्यकर्त्यांना आणि गावातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना सर्वं बाबतीत सहकार्य करू शकतो. शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी आणि संपर्क प्रमुख प्रसाद सावंत यांच्या नेतृत्वाखाली आमचे शिवसेनेतील सर्व नवोदित कार्यकर्ते एकदिलाने यापुढेही शिवसेनेचे निष्ठेने काम करून निश्चितच याहीवेळी नगरपरिषदेवर भगवा झेंडा फडकविणार हा आम्हाला विश्वास आहे.
>
> **सागर पाटील, नवोदित शिवसेना सदस्य (शिवसैनिक) माथेरान**

# संक्षिप्त...

## प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या वतीने कोकणाला मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल करंजाडे येथील प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या वतीने कोकणला मदतीचा हात म्हणून विविध वस्तू पनवेलच्या तहसिलदार कार्यालयात जमा करण्यात आल्या व त्याचे वाटप संबंधित बाधित ठिकाणी होणार आहे.

प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या वतीने महाड, तळा ,चिपळूण ,रत्नागिरी कोकणातील इतर ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले. तेथील पुरग्रस्तांना मदत तहसिलदार पनवेल येथे जमा करून त्याच्या माध्यमातून मदत आज रवाना झाली. त्यावेळी प्रबुद्ध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## महाड -पोलादपूर पूरग्रस्तांना मदत



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

गेल्या आठवडाभर कोकणाला झोडपणाऱ्या तुफानी पावसाने संपूर्ण कोकण उध्वस्त करून सोडले होते. त्यात रायगड जिल्ह्यात सर्वत्र अतिवृष्टीमुळे संपूर्ण जनजीवन उध्वस्त झाले असून अतिवृष्टी आणि दरडी कोसळून महाड आणि पोलादपूर तालुक्यातील अनेक कुटुंब दरडी खाली गाडली गेली असून अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. लोकांना पिण्याच्या पाण्याचा थेंबासाठीही चातकासारखी वाट पहावी लागत आहे, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हसळा शहर आणि तालुक्यातील ग्रामस्थ तसेच म्हसळा नगरपंचायत यांच्या विद्यमाने पूरग्रस्थानसाठी जीवनावश्यक वस्तू गोळा करून गेल्या दोन दिवसांपासून महाड पोलादपूर येथील पूरग्रस्थानसाठी मदतीचा ओघ सुरु असून जोपर्यंत जनजीवन पूर्ववत होत नाही तोपर्यंत म्हसळ्यातून महाड पोलादपूर पूरग्रस्थानसाठी मदत पुरविण्याचा निर्धार म्हसळा वासियांनी केला आहे. वैद्यकीय अधिकारी आणि त्यांच्या टीमकडून पूरग्रस्त जखमीनवर फार मोठ्या प्रमाणात उपचारही सुरु आहेत.

# कामगार नेते महेंद्र घरत यांचा पगारवाढीचा सपाटा कायम ; ऑलकार्गो मधील कामगारांसाठी पगारवाढीचा करार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामगार नेते महेंद्र घरत यांच्या न्यु मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेचे कार्य न थांबता कोणत्याही परीस्थीतीत कामगारांना न्याय मिळवून देताना दिसत आहे. जानेवारी २०२१ पासुन वेगवेगळ्या कंपन्यांतील कामगारांसाठी १० पगारवाढीचे करार संघटनेच्या माध्यमातून करण्यात आले. मे. ऑलकार्गो लॉजिस्टीक्स, जे.एन.पी.टी उरण या सि.एफ.एस मधील मे. स्वामी समर्थ शिपींग मधील कामगारांसाठी ८२०० ते ९५०० रूपयांचा पगारवाढीचा करार संघटनेच्या कार्यालयात करण्यात आला.

कामगार नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्व कौशल्याने, मुळ मालकांना मध्यस्थी करण्यास भाग पाडुन कामगारांना चांगली पगारवाढ मिळवून



दिली. या करारनाम्यानुसार कामगारांना तीन वर्षीसाठी ८२०० ते ९५०० रूपये पगारवाढ, एक ग्रॉस सॅलरी बोनस, अडीच लाख रूपयांची मेडिक्लेम पॉलीसी, कॅन्टीन सुविधा नव्याने सुरू करण्यात आली आहे. तसेच फेस्टीव्हल ॲडव्हान्स देण्याचे मान्य करण्यात आले आहे.

या पगारवाढीच्या करारनाम्याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष कामगार नेते महेंद्र घरत, कार्याध्यक्ष पि.के. रामण, सरचिटणीस वैभव पाटील, उपाध्यक्ष किरीट पाटील, संजय ठाकूर, दिपक ठाकूर, सुजित म्हात्रे, लंकेश ठाकूर, मनोहर ठाकूर, अजित ठाकूर तर व्यवस्थापनातर्फे अजिंक्य हातीशकर (पार्टनर), अभिजित पाटील (कायदेशिर सल्लागार), जयेश शिंदे (एच.आर. मॅनेजर) तसेच कामगार प्रतिनिधी प्रशांत ठाकूर, राजाराम पाटील, ज्ञानदीप ठाकूर, प्रथमेश पाटील, संदीप पाटील, जितेंद्र पाटील, उत्कर्ष ठाकूर व इतर कामगार उपस्थीत होते. कामगारांनी यावेळी संघटनेचे अध्यक्ष महेंद्र घरत व कार्यकारीणीचे आभार मानले.

# अखंड पत्रकारितेचे खडतर व्रत जोपासत नवीन सोष्टे गेले मात्र असंवेदनशील सरकारने त्यांना पेन्शन दिली नाही : एस.एम.देशमुख

**दै.रायगड नगरी । माणगाव**

रायगडमधील नागोठणयाचे पत्रकार नवीन सोष्टे यांच्या निधनाची बातमी शोकाकुल करणारी आहे. रायगडमध्ये असताना जे माझे कौटुंबिक मित्र होते त्यात सोष्टे यांचा समावेश होता. रायगड सोडल्यानंतर ही आम्ही एकमेकांच्या संपर्कात होतो. पत्रकार नवीन सोष्टे यांच्या निधनामुळे एक चांगला मित्र मी आज गमविला आहे.



नवीन सोष्टे यांना पत्रकार पेन्शन योजनेचा लाभ मिळावा यासाठी बरेच प्रयत्न केले. मात्र असंवेदनशील सरकारी यंत्रणेनं त्यांना शेवट पर्यंत पेन्शन मिळू दिली नाही. नवीन सोष्टे अधिस्वीकृती धारक पत्रकार तर होतेच त्याचबरोबर आयुष्याची ४०–४५ वर्षे त्यांनी केवळ पत्रकारिता आणि पत्रकारिताच केली. मात्र तुम्ही ३० वर्षे पत्रकारितेत नाहीत असे नेहमीचे कारण देत त्यांना पेन्शन नाकारली गेली.

आयुष्यभर पत्रकारिता जगलेल्या नवीन सोष्टे यांच्याकडे उत्पन्नाचे अन्य कोणतेच साधन नव्हते. त्यामुळे त्यांना पेन्शनची सक्त गरज होती. परंतू .तांत्रिक मुद्दे उपस्थित करून माहिती आणि जनसंपर्क मधील अधिकरयांनी सोष्टे यांना त्यांच्या हक्कांपासून वंचीत ठेवले .आज पेन्शन मिळेल, उद्या मिळेल अशी पतिक्षा करीतच सोष्टे आज कायमचे निघून गेले.पण अखेरपर्यंत त्यांना पेन्शन मिळाली नाही.तोंड पाहून पेन्शन दिली जाते, जे पात्र नाहीत अशा अनेकांना पेन्शन दिली जाते पण सोष्टे सारख्या अनेकांच्या बाबतीत केवळ तांत्रिक मुद्दे उपस्थित करून त्यांना डावलले जाते.हा अनुभव एकट्या नवीन सोष्टे यांचा नाही.

राज्यातील किमान २०० ज्येष्ठ आणि वयोवृद्ध पत्रकारांची अवस्था नवीन सोष्टे पेक्षा वेगळी नाही.चीड आणणारं आहे हे सारं. दु:ख याचं होतं की, राज्याच्या माहिती आणि जनसंपर्क राज्यमंत्री अदिती तटकरे रायगडच्या आ–हेत.. त्यांच्या गावच्या पत्रकारावर हा अन्याय झालेला आहे. अलिबागमधील एका कार्यक्रमात अदिती तटकरे आणि महासंचालक डॉक्टर दिलीप पांढरपट्टे यांना सोष्टे यांच्यावर कसा अन्याय केला जात आहे हे मी निर्दर्शनास आणून दिले होते.मात्र त्यानंतरही काही झाले नाही.

सोष्टेचीच नव्हे तर महाराष्ट्रातील वयोवृद्ध पत्रकारांच्या या वेदना मुख्यमंत्र्यापर्यत पोहोचूच दिल्या जात नाहीत आणि पत्रकारांना भेटायला मुख्यमंत्र्यांकडे वेळ नाही अशा स्थितीत आणखी किती नवीन सोष्टे पेन्शनची पतिक्षा करीतच आपल्याला सोडून जातील सांगता येत नाही.

पेन्शन योजनेसाठी आम्ही तब्बल २२ वर्षे सरकार दरबारी पाठपुरावा केला. पेन्शन योजना सुरू करून सरकारनं ढोल तर बडवून घेतले पण ज्यांच्यासाठी ही पेन्शन योजना अपेक्षित होती ते सारेच पत्रकार या योजनेच्या परिघाबाहेर ठेवले गेले. जे पेन्शन योजनेचे लाभार्थी ठरूच शकत नाहीत पण त्यांना पेन्शन दिली गेली अशी किमान पंचवीस नावं माझ्याकडे आहेत आणि ती दिलीप पांढरपट्टे यांना मी सांगितली आहेत. पण बदल होत नाही. सरकारकडे पैसे नसतील किंवा पत्रकारांना पेन्शन देऊच नये असे सरकारमधील काहींना वाटत असेल तर ही पेन्शन योजना बंद केली तरी हरकत नाही. कारण योजनाच नसेल तर दुःख होणार नाही पण पात्र असूनही आपल्याला डावलले जाते हा अन्याय किमान पत्रकारांना सहन होत नाही.पण वयपरत्वे ते काही करूही शकत नाहीत.त्यातून केवळ दु:ख पदरी पडते. जे नवीन सोष्टे यांच्या वाट्याला आले. एका ध्येयवादी, तत्त्वनिष्ठ पत्रकाराच्या बाबतीत हे सारं घडायला नको होतं.

रायगडवर नितांत पेम असणारा, रायगडच्या पश्नांची चांगली माहिती असणारा, चळवळीशी नातं सांगणारा,गळ्यात शबनम अडकवून कायम भटकंती करणारा, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्षपद समर्थपणे पेलणारा एक जागरूक, सतत सामान्यांची बाजू घेऊन लढणारा पत्रकार आणि सिद्धहस्त लेखक (नवीन सोष्टे यांची विविध विषयांवरची १८ पुस्तकं पसिध्द आहेत) आज आपण गमविला आहे.नवीन सोष्टे यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून येणारी नाही.

# मुरुडमधील दुर्घटनाग्रस्त काशीद पुलाचे काम पूर्ण

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील काशीद येथील अतिवृष्टीमुळे कोसळलेल्या दुर्घटनाग्रस्त पुलाचे काम जवळपास पूर्ण झाले असून बांधकाम नवीन असल्याने पाच ते सहा दिवस त्यावरून वाहतूक करता येणार नसल्याचे सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सांगण्यात आले आहे. पुलाच्या दोन्ही बाजूने रस्ता बंद करण्यात आला आहे. दरम्यान या पुलाच्या दुर्घटनेत मृत्यू झालेले विजय चव्हाण यांच्या कुटुंबीयांनी तसेच भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष अँड महेश मोहिते आणि काशीद ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह अनेकांनी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती त्यानुसार सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांवर भादवि कलम ३०४ (अ) सह अन्य कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची नावे समोर आली नसली तरी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे अधिक तपास करीत आहेत. मुरुडमध्ये पावसाने सध्या पूर्ण विश्रांती घेतली असून शेतात साचलेले पाणी ओसरत आहे. बळीराजांनी शेतीची कामे परत सुरू केली आहेत. तसेच पूरग्रस्त महाडमध्ये मुरुडमधून मदतीचा ओघ सुरू झाला असून मुरुडमधील मुस्लिम समाजातर्फे जीवनावश्यक वस्तूंचा एक टेम्पो नुकताच महाडकडे रवाना झाले आहे. मुरूड व्यापारी समाजबांधवांनी सुमारे रु ७५००० किमतीचे अन्नधान्य, डॉक्टर्स मेडिकल असोसिएशन तर्फे अन्नधान्य व कपडे, संजीवनी आरोग्य संस्थेतर्फे अन्नधान्य, मुरुड मर्चंट क्रेडिट को .ऑप. सोसायटी तर्फे जीवनावश्यक वस्तू तसेच महात्मा फुले पतसंस्थे कडूनही रु. ६००० पर्यंतची मदत देण्यात आली आहे , ही सर्व मदत गोळा करून तहसीलदार मुरूड यांच्या मार्फत महाडकडे रवाना झाली आहे, याकामी मुरूड तालुका व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नितिन आंबूर्ले व समाजसेवक जहिद फकजी यांनी विशेष परिश्रम घेतले.



# ममता कॉस्मेटिक्स दुकानाला लागलेल्या आगीच्या वेळी नगरसेवक राजू सोनी यांनी केले तत्परतेने मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील ममता कॉस्मेटिक्स दुकानाला लागलेल्या आगीच्या वेळी स्थानिक नगरसेवक राजू सोनी यांनी धाव घेऊन तत्परतेने हि आग विझवण्यासाठी मोठी मदत केली आहे.

पनवेल मधील जुने भाजी मार्केट येथे नारायण शर्मा यांच्या मालकीचे असलेले ममता कॉस्मेटिक्स यांच्या दुकानाला आग लागली याची माहिती येथील काही व्यापाऱ्यांनी नगरसेवक राजु सोनी यांना फोन करून दिली ते तत्काळ तेथे पोहोचले व लगेच अग्निशामक दलाला फोन करून ताबडतोब बोलवले व त्या ठिकाणी संपुर्ण महानगरपालिकेची यंत्रणा लावुन स्वतः उभे राहून संपूर्ण आग विझवण्यात आली त्यामुळे येथील व्यापाऱ्यांनी त्यांचे खुप आभार मानले आहेत.

# महापालिकेचे रिपोर्ट पॉझिटिव्ह खाजगी रिपोर्ट निगेटिव्ह करायचं काय, कुटुंबीय भयभीत

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

करोना महामारी चे भवितव्य व वैद्यकीय इलाज ज्या प्रयोगशाळेच्या अहवालावर अवलंबून असते त्याच दोन प्रयोग शाळेमधून दोन वेगवेगळे अहवाल एकाच कुटुंबातील दोघांचे आल्याने कुटुंबीय विचित्र मनस्थितीत अडकले आहेत. महापालिकेकडून करण्यात आलेल्या चाचणीच्या अहवालात कुटुंबातील दोन व्यक्ती या पॉझिटिव आढळल्या तर नामांकित असणाऱ्या खाजगी प्रयोगशाळेत चाचणी केली असता तेच निगेटिव असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे कळंबोलीतील एक कुटुंबीय नेमके एकावे कोणाचे या मनस्थितीत अडकले असून भीतीच्या वातावरणात आ–हेत. त्यामुळे प्रयोगशाळेचे अहवालही किती तंतोतंत खरे असतात हे यावरून सिद्ध होत आहे.

कळंबोलीत एवरेस्ट सोसायटी मध्ये कोरोना रुग्ण आढळल्याने या इमारतीत वास्तव्यात असणाऱ्या रत्नप्रभा जालिंदर शेटे व त्यांची मुलगी ऐश्वर्या शेटे यांची पनवेल महापालिकेच्या कळंबोलीतील वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करून त्यांचे कोरोना चाचणी चे नमुने मुंबईतील थायोकेयर प्रयोगशाळेत पाठवण्यात आले. या प्रयोगशाळेकडून २२ जुलै रोजी त्यांचे अहवाल हे पॉझिटिव्ह असल्याचे आढळून आल्याने त्यांच्यावरती वैद्यकीय उपचार सुरू करण्यात आले. मात्र कोरॉना बाबतचे कुठलीही लक्षणे त्यांना दिसून येत नसल्याने त्यांनी स्वतःहून नामांकित असलेल्या मेट्रोपोलीस प्रयोगशाळेत चाचणीसाठी नमुने पाठवून दिले. त्यांचे अह–वाल २४ जुलैला निगेटिव असल्याचे आढळून आले. एकीकडे महापालिकेच्या अहवालानुसार त्यांच्यावर उपचार करण्यात आले व त्यांना काही दिवस घरातच थांबण्याचा सल्ला देण्यात आला. तर दुसरीकडे अहवाल निगेटिव आल्याने या करोना चाचणी च्या अहवालावर विश्वास तरी कसा ठेवायचा या विवंचनेने मध्ये कळंबोलीतील शेटे कुटुंबीय अडकले आहेत. याबाबत पनवेल महापालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉक्टर आनंद गोसावी यांच्याशी याबाबत संपर्क साधला असता ते म्हणाले की कोरोना महामारी मध्ये प्रथम चाचणी करण्यात आल्यानंतर आढळलेला अहवालच हा योग्यरीत्या असतो. त्यानुसार संबंधित व्यक्तीने कोरोना बाधित असल्याने त्यांनी त्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे .जरी व्यक्तीला कोणतीही कोरोनाची लक्षणे दिसत नसली तरी तरीही कोरोरणाचे विषाणू शरीरात असतातच. त्यामुळे जरी दुसरा अहवाल निगेटिव्ह असला तरी संबंधित नागरिकाने आपली स्वतःची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. पुन्हा काही त्याबाबत शंका असल्यास नजीकच्या महापालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना जाऊन भेटणे व त्यांचा सल्ला घेणे उचित ठरेल.